# संघ, मंदिर आणि शौचालय

बरीच वर्षे अटीतटीने प्रयत्न केल्यानंतर  ६ डिसेंबर १९९२ रोजी संघ परिवार बाबरी मशीद उध्वस्त करण्यात यशस्वी झाला. जरी याचे पुढारीपण लालकृष्ण अडवाणी यांच्याकडे असले तरी अनेक स्वयंसेवकांनी मशीद पाडायच्या कामात हिहीरीने पुढाकार घेतला.त्यातच एक नाव होते नरेंद्र मोदी! भाजपाचे आजचे पंतप्रधानपदाचे उमेदवार. या मंदीर मशिदीच्या प्रश्नाला एवढे महत्व दिले गेले की समाजाचे अनेक महत्वाचे प्रश्न बाजूला पडले. ज्या देशातील जनतेला २ वेळच्या जेवणाची भ्रांत आहे, त्यांचे प्रश्न सोडवण्यापेक्षा अडवाणी, मोदी आणि कंपनीला मंदिराचा भावनात्मक प्रश्न महत्वाचा वाटत होता. त्यावेळी एका मासिकाने केलेल्या सर्वेक्षणातून असे दिसून आले होते की वादग्रस्त जागी मंदिर किंवा मशीद बांधण्यापेक्षा इस्पितळ किंवा शाळा बांधली असती तर लोकांना अधिक आवडले असते. बसपा नेते कांशीराम यांनी तर शौचालय बांधण्याची मागणी केले होती.

२ वर्षापूर्वी केंद्रीय मंत्री जयराम रमेश हे म्हणाले होते की शौचालये ही देवळापेक्षा महत्वाची आहेत. मोदींनी सुद्धा नुकतेच शिवालयापेक्षा शौचालये महत्वाची आहेत असे विधान केले होते. परंतु रमेश यांच्या विधानानंतर संघाच्या कार्यकर्त्यानी मूत्र भरलेल्या बाटल्या श्री. जयराम रमेश यांच्या घरासमोर ठेवून निषेध केला होता. भाजपच्या प्रवक्त्यांनी श्री. रमेश यांच्यावर ते कोट्यावधी हिंदू बांधवांच्या धर्म आणि श्रद्धेवर घाला घालत आहेत असा आरोप केला होता. ज्यावेळी मोदींनी विधान केले होते तेव्हा मात्र प्रविण तोगडीयांचा अपवाद वगळता संघ परिवार सोयीस्कररीत्या गप्प बसला. अनेक समालोचक असे म्हणाले की हि हिंदुत्वाची सौम्य बाजू आहे आणि यामुळे भाजपचे मतदान वाढून त्याला फायदाच होईल. जयराम रमेश यांनी मात्र एक वास्तववादी विधान केले यापुढील निवडणुका कॉग्रेस आणि भाजपमध्ये होणार नाहीत तर कोंग्रेस आणि संघ परिवार यांच्यामध्ये होणार आहेत.

जरी काही राजकीय पंडीतांच्या मते ही हिंदुत्वाची पुरोगामी बाजू असली तरी हे पक्के लक्षात ठेवले पाहिजे की निवडणुकीची सूत्रे यावेळी भाजपच्या नव्हे तर संघ परिवाराच्या हातात आहेत. हे सर्व भाजपची मतपेढी पक्की . करण्यासाठी असणारे संघाचे डावपेच आहेत. म्हणूनच बाबरी मशीद पाडल्यानंतर २० वर्षांनी मोदी असे सांगत आहेत की शौचालये मंदिरापेक्षा महत्वाची आहेत. संघ परिवार १० तोंडानी बोलणारा रावण आहे. एकीकडे विश्व हिंदू परिषद आणि त्यांच्या जातभाईनी राममंदिर प्रश्न जिवंत ठेवायचा, दुहीचे राजकारण करायचे, तर दुसरया बाजूला मोदींची प्रतिमा विकासपुरुष, उत्तम प्रशासक अशी करायची अशी संघाची दुतोंडी नीती आहे.

पुढील निवडणुकासाठी संघ परिवार वेगवेगळ्या पातळ्यावर वेगवेगळी धोरणे आखत आहे. एक म्हणजे जातीय दंगली आणि हिंसेच्या माध्यमातून समाजात फुट पाडणे आणि दुसरी म्हणजे मोदींसाठी दुहेरी प्रचारयंत्रणा उभी करणे. ज्यामध्ये गुजराथ मॉडेलचा गवगवा करायचा आणि मोदींच्या नेतृत्वाची आणि प्रशासकीय कौशल्याची तारीफ करायची. यामुळेच जर मोदी हे शौचालयाची व विकासाची भाषा करत असले तर ही एक चाणाक्ष चाल आहे. मोदींची गुजराथमधील मतपेढी ही गोध्रानंतर झालेल्या हिंसाचाराने आणि दुहीच्या राजकारणाने झाली. या सर्व वर्षात त्यांनी हिंदुत्ववादी राजकारणाचा अजेंडा पुढे केला. ज्यावेळी त्यांचे राजकारणातील स्थान पक्के झाले त्यावेळी त्यांनी विकासाची भाषा सुरु केली. अर्थात त्यांनी केलेले विकासाचे दावे हे अनेक संस्थानी केलेल्या पहाणी अहवालानंतर

खोटे ठरू लागले आहेत. अगदी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालानुसार गुजराथमधील प्रत्येक तिसरे मुल हे कुपोषित आहे. या व अशा अनेक प्रकारच्या अनेक अहवालांनी गुजराथ विकासाचे भ्रमाचे भोपळे फोडले आहेत.

जयराम रमेश यांच्या मते कॉंग्रेसची पुढची लढाई संघाबरोबर आहे अर्थात यात काहीच शंका नाही. भाजपावर संघाची पूर्ण पकड आहे. संघाने राष्ट्रपतीपदासाठी व पंतप्रधानपदासाठी उमेदवार जाहीर करून हे दाखवूनच दिले आहे. आतापर्यंत हे स्पष्टच झाले आहे की भाजपाचे सर्व वरिष्ठ नेते हे संघाचे कट्टर स्वयंसेवक आहेत. अगदी अटलबिहारी वाजपेयी यांनी अमेरिकेतील स्टेटन बेटावर केलेल्या भाषणात “मी प्रथम संघ स्वयंसेवक आहे” असे सांगितले होते. प्रत्येक संघ सेवकाला संघामध्ये हिंदुराष्ट्र तयार करणे याच एका ध्येयावर काम करायला सांगतात. याच गोष्टीचे प्रशिक्षण दिले जाते. आणि मग हे स्वयंसेवक समाजाच्या वेगवेगळ्या स्तरावर कामाची जबाबदारी उचलतात. हे स्वयंसेवक संघाचा कणा आहेत. त्यांचे नेतृत्व संघामाधुनच आलेले असते. मग मोदी शौचालय हवे म्हणून प्रचार करतात तर तोगडीया देऊळ हवे म्हणूनच हट्ट धरतात. खालच्या पातळीवर कोणी हिंसाचाराचा वा भावना भडकावणारा व्हिडिओ मोबाईलवरून सर्वत्र पाठवतो, तर कोणी इतिहासाच्या पुस्तकामध्ये हिंदुत्ववाद घुसवण्याचा प्रयत्न करतो. तर कोणी राष्ट्रपुरुषांना भगवा रंग फासतो. (उदा. शिवाजी अफजलखान भेट म्हणजे हिंदुनी मुस्लीम

दहशतवादाचा केलेला मोड मानणे). या स्वयंसेवकानी आता राज्याच्या वेगवेगळ्या प्रशासकीय संघटनात प्रवेश केला आहे. कोणी म्हणेल की भाजपने आता राजकीय पक्ष म्हणून वेगळा पर्याय दिला आहे. परंतु हे समजून घेतळे पाहिजे की संघाचे भाजपवरील नियंत्रण हे फक्त निवडणुकीपुरते मर्यादित नाही आहे. हा त्यांच्या हिंदुराष्ट्र निर्मितीमधील भागाचा फक्त एका टप्पा आहे. म्हणून वनवासी आश्रम वा सामाजिक समतरता मंच हे दुर्गम वा दुर्लक्षित भागात काम करत असले तरी ते हिंदुराष्ट्राचीच पायाभरणी करत असतात. हा संघाचा हिंदुराष्ट्राचा अजेंडा आपल्या देशाच्या विविधतेशी पूर्णपणे विरोधी आहे. समाजातील उच्चवर्णीय लोकांची मक्तेदारी करण्याचे कारस्थान आहे. हे संघाचे काम मागील ३० वर्षापासून चालु आहे. परंतु जेव्हा भाजपाचे सरकार सत्तेवर येते तेव्हा या कामाला आणखी वेग येतो. जेव्हा भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर (१९९९ ते २००४) होते तेव्हा हे दिसून आले आहे. आतासुद्धा ज्या राज्यांमध्ये भाजपाचे सरकार आहे तेथेही हे दिसून येत आहे. जर रमेशसारख्या नेत्याना हे कळून चुकले असेल तर आनंदच आहे. परंतु प्रत्येक नागरिकाने हे संघाचे स्वरूप समजून घेतलेच पाहिजे. ज्या नागरिकाला आपल्या देशामध्ये लोकशाही, विविधता, व राज्यघटनेची कदर असेल तर त्यानी धार्मिक राष्ट्रावादाकडे फक्त निवडणुकीच्या वेळी मत मिळवण्याचे साधन म्हणून बघता कामा नये. ही लढाई समाजाच्या अनेक क्षेत्रात खेळली जाणार आहे आणि खूप काळ चालणार आहे. यामध्ये निवडणुका तर आहेतच  पण साहित्य, कला व आपले नेहमीचे जीवनही सामील आहे.